खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

**आजचा सुविचार**

स्वत:ला कधीही कमी लेखू नका;
तुमच्या आत्मविश्वासाने
अशक्य गोष्टी सुद्धा
शक्य होऊ शकतात.

वर्ष : ०५ | अंक : १४२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.०४ जानेवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## कार्यसम्राट नाही, करप्शन सम्राट! शिंदेंचा उद्धव ठाकरेंवर घणाघात

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, मुंबई :** कोणी माईचा लाल आला तरी कुणाच्याही सात पिढ्या खाली आल्या तरी मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी होऊ शकत नाही. आता भावनेचं राजकारण संपलंय, मुंबईकरांना विकासाचे मारेकरी नको तर विकासाचे वारकरी हवेत, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर शेलक्या भाषेत टीकास्त्र सोडले.

मुंबईतील आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिंदेंनी ठाकरेंच्या 'करून दाखवलं' या घोषणेचा समाचार घेत त्यांना 'करप्शन सम्राट' म्हणत त्यांच्यावर हल्लाबोल केला आहे. ते आज वरळीतल्या महायुतीच्या पहिल्या प्रचारसभेत बोलत होते.

**शिंदे नेमकं काय म्हणाले?**

'भावनेवर तुम्हाला आता निवडणुका जिंकता येणार नाही. तुम्हाला लोकांना विकास करून दाखवावा लागेल. मुंबईकरांना विकासाचे मारेकरी नकोत, मुंबईकरांना विकासाचे वारकरी पाहिजेत, आता बदलली आहे परिस्थिती. मुंबईकर जनता सुज्ञ आहे. दिवसभर नेटफक्स आणि निवडणुका आल्या की पॉलिटिक्स तो गेला जमाना आता. ज्यांनी मुंबईची वाट लावली अशा लोकांच्या हातात मुंबई देणार? कधीच मिळणार नाही. एवढे वर्ष मुंबईत यांची सत्ता होती, तरी सुद्धा मराठी माणूस वसई- विरार नालासोपारा इकडे अंबरनाथ बदलापूरकडे का फेकला गेला? याच उत्तर द्या.' असं शिंदे म्हणाले.

मराठी माणूस मुंबईतून हद्दपार का झाला? कुणामुळे मुळे झाला? याला जबाबदार कोण? याचं उत्तर द्या. मुंबईच्या मेट्रो प्रकल्पात खो कोणी घातला? याचं उत्तर द्या. मुंबईची लाईफलाईन असलेल्या बेस्टच वाटोळ कोणी केलं? कोविड रुग्णांच्या तोंडातली खिचडी कोणी खाल्ली? बॉडी बॅग मध्ये पैसे बनवण्याच पाप कोणी केलं? गरीब मुंबईकरांच्या घराच स्वप्न धुळीला कोणी मिळवलं? मुंबईत मोक्याचे भूखंड धनदांडग्यांच्या घशात कोणी घातले? गिरणी कामगारांच्या तोंडाला पानं कोणी पुसली? बीडीडी चाळीतल्या रहिवाशांचे हाल कोणी केले? पत्रा चाळीतल्या लोकांना देशोधडीला कोणी लावलं?', अशा अनेक प्रश्नांची सरबत्ती करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर एकच हल्लाबोल केला आहे. यावेळी पुढे ते म्हणाले की, नंतर आपण (महायुती) घर बीडीडी चाळीतल्या लोकांना घर दिली.



**किती करुन दाखवलं वर बोट**

यावेळी शिंदेंनी ठाकरेंच्या करुन दाखवलं या जाहिरातीतील घोषणेवर म्हणाले की, 'यांनी कचऱ्यात करप्शन करून दाखवलं, गटारात करप्शन करून दाखवलं, डांबरात करप्शन करून दाखवलं, खिचडीत करप्शन करून दाखवलं, मिठी नदीच्या गाळात करप्शन करून दाखवलं. आम्ही करून दाखवलं म्हणातात हे कार्यसम्राट आहेत? मी म्हणेन हे करप्शन सम्राट आहेत. किती खाणार? आणि त्यांची भूमिका करप्शन फर्स्ट आणि आमचं महायुतीच मुंबई फर्स्ट. हा फरक आहे. आमच मिशन महाराष्ट्र फास्ट आणि मुंबई सुपरफास्ट हे आमचं मिशन आहे. खूप वर्ष मुंबई लुटून खाल्ली तुम्ही. आता तुमची बनवाबनवी चालणार नाही. तुमच्या झाशामध्ये मुंबईकर येणार नाही. आता फसणार नाही.'

**'मराठी कंत्राटदारांना ब्लॅकलिस्ट'**

'मराठी माणसाबद्दल बोलता, महापालिकेचे कंत्राट देताना कधीतरी मराठी माणूस दिसला का तुम्हाला? मराठी कंत्राटदारांना ब्लॅकलिस्ट करण्याच पाप कोणी केलं?जिथे टेंडर तिथे सरेंडर ही भूमिका तुमची कायम राहिली आहे. त्यांच्या किचन कॅबिनेट मधला चंपकलाल कोण आहे? पत्रकारांनी जरा शोधपत्रकारीता करावी. रमाबाई आंबेडकरांचा १७ वर्ष प्रकल्प रखडला होता. आपण तुम्ही आम्ही मिळून तो प्रकल्प पुढे नेतोय.

एसआरएबरोबर एम एम आरडीए काम करते, त्यांना १७ वर्ष २० वर्ष भाड नव्हतं, १६० कोटी रुपये भाडं आपण दिलं, आणि १७ हजार घरांचा प्रकल्प पुढे नेतोय. त्याला चालना आपण देतोय, असे अनेक प्रकल्प मुख्यमंत्री आणि आम्ही मिळून या ठिकाणी मुंबईत करतोय', असंही उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

## सावित्रीबाई फुले यांचे स्मारक विषमतेविरोधात लढण्याची प्रेरणा देईल : मुख्यमंत्री फडणवीस

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, नायगाव (सातारा) :** क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे नायगाव येथे उभे राहणारे स्मारक त्यांच्या कार्याची आठवण देईल, त्यामुळे लढण्याची प्रेरणा तर मिळेलच परंतु समाजातील विषमतेच्या विरोधात क्रांतीची बिजे तयार होतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. महिलांना अधिकार देण्यासाठी, त्यांना सक्षम करण्यासाठी येथे उभ्या राहणाऱ्या महिला प्रशिक्षण केंद्रात आवश्यक सर्व प्रकारच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

नायगाव (ता. खंडाळा) येथे आयोजित क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९५ व्या जयंती कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या १४३ कोटी रुपये खर्चून उभारण्यात येणाऱ्या स्मारकाचे तसेच महिला प्रशिक्षण केंद्राचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी विधानपरिषदेचे सभापती



प्रा.राम शिंदे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, पालकमंत्री शंभूराज देसाई, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, आमदार डॉ.अतुल भोसले, मनोज घोरपडे, सचिन पाटील, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, नायगावच्या सरपंच स्वाती जमदाडे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्रात आणि देशात स्त्री शिक्षणाची सुरुवात करणाऱ्या, स्त्रीयांना गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त करणाऱ्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्मारक प्रेरणादायी ठरेल, अशी भावना व्यक्त करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी समाजातील अनिष्ट रुढीवादाच्या विरोधात क्रांतीचे रणशिंग फुंकले आणि समाजामध्ये समता प्रस्थापित करण्याकरिता व्यवस्था उभी केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, रूढीवाद, विषमता, जातिवाद यामुळे सामाजिक, आर्थिक गुलामगिरी ओढवते. महिलांना शिक्षणाचा अधिकार नव्हता, विधवांना संपत्तीचा अधिकार नव्हता. अशा स्थितीत त्यांनी समाजातील रुढींच्या विरोधात बंड पुकारले आणि महिलांना शिक्षणाचा अधिकार देण्यासाठी पहिली मुलींची शाळा सुरू केली. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या मार्गावर शासन चालत आहे. शासनाने लाडक्या बहिणींना लखपती दिदी बनविण्याच्या घेतलेल्या निर्णयानुसार आतापर्यंत ५० लाख लखपती दीदी झाल्या असून यावर्षी १ कोटीपर्यंत पोहोचू, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

सातारा जिल्ह्यात दीड लाख लखपती दीदी झाल्या आहेत याचा आनंदही त्यांनी व्यक्त केला. संत सावता माळी यांचे अरण येथील स्मारकही भव्य-दिव्य असेल. त्यासाठी आवश्यक त्या व्यवस्था उभ्या करण्यात येत आहेत, असेही त्यांनी सांगितले.

नायगावचे नाव सावित्रीबाई फुले यांच्या नावाने करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. ग्रामसभेने तसा निर्णय घेऊन तो ग्राम विकास विभागामार्फत पाठविल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ म्हणाले, १९९३ मध्ये नायगाव येथे सावित्रीबाई फुले यांच्या जन्म झालेल्या वाड्याचा शोध घेतला. निधीची उभारणी करून घर आणि स्मारक उभे राहिले. २०२७ मध्ये महात्मा फुले यांची २०० वी जयंती असून ती देशभर साजरी करण्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जाहीर केले आहे. त्या अनुषंगाने मुंबई येथे कलिना भागात आंतरराष्ट्रीय ग्रंथालय उभे करण्याचे निश्चित केले आहे.

ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे म्हणाले, सावित्रीबाई फुले यांचे भव्य-दिव्य स्मारक उभे रहावे यासाठी आराखड्याला मान्यता देण्यात आली आहे. महिला प्रशिक्षण केंद्राचे काम ही वेगात होईल. महात्मा फुले यांचे मूळ गाव कटगुण येथेही ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून भव्य-दिव्य स्मारक उभारण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील म्हणाले, त्याकाळी समाजामध्ये प्रचंड दरी, शिक्षणाचा अभाव, अज्ञान, भेदभाव, अनिष्ट रूढी असताना त्यांनी पहिली मुलींची शाळा सुरू करून क्रांती केली. ग्रामीण महाराष्ट्रात क्रांतिज्योतींच्या नावाला साजेसे शैक्षणिक संकुलही उभे राहील असे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविक सरपंच स्वाती जमदाडे यांनी केले. मान्यवरांनी महिला स्वयंसहाय्यता समुहांनी उत्पादित केलेल्या वस्तूंच्या प्रदर्शन व विक्री दालनांना भेट दिली. यावेळी माजी आमदार राम सातपुते, बळीराम सीरस्कार, जिल्हाधिकारी संतोष पाटील, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक तुषार दोशी आदी उपस्थित होते.

## लोहा मुदखेड महसूल पोलीस प्रशासनाची रेती घाटावर संयुक्त कारवाई

### ४२ लाखांचे साहित्य नष्ट !

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०३, मुदखेड (नांदेड) :** जिल्ह्यांतील लोहा तालुक्यातील येळी मुदखेड तालुक्यांतील महाटी येथील गोदावरी नदी पात्रातून अवैध रेती उत्खनन सुरू असल्याची माहिती मिळाली होती मुदखेड चे तहसीलदार आनंद देऊळगावकर लोहाचे तहसीलदार विठ्ठल परळीकर मुदखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२ जानेवारी रोजी येळी महाटी गोदावरी नदी पात्रातून अवैध रेती उपसा करीत असताना भल्या पहाटे कारवाई करण्यात आली यात येळी गोदावरी नदीकाठावरील २ मोठे इंजिन व २ छोटे इंजिन जप्त करण्यात आले सदर चे बोटी या नदी किनाऱ्यालगत आणून व तसेच ५ तराफे नदी किनाऱ्यावर आणून जागीच नष्ट करण्यात आले तर जिलेटीनच्या सहायाने बोटी उध्वस्त करण्यात आल्या.ह्या कार्यवाहीत अंदाजे ४२ लाखांचे रेती उत्खनन करणारे साहित्य उध्वस्त करण्यात



आले.

या कारवाईत मुदखेड तहसीलदार आनंद देऊळगावकर लोहा तहसीलदार विठ्ठल परळीकर मुदखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण,सहाय्यक पोलिस निरक्षक संजय नीलपत्रवार, नायब तहसीलदार संतोष कामटेकर,पाटे, तलाठी राजु चव्हाण, राजकुमार मस्के, गोपाळ माने,उस्माननगर ,आणि मुदखेड व मंडळ अधिकारी कापशी बू,शिवकांता पवार व शेवडी बाजीराव खंडोजी ,ठाकूरअजय,तानाजी सुगावे तलाठी गोदने,एकाडे, बोधगिरे,रायाजी मोतीराम पवार,पांडागळे,जाधव,मुंढे, लाडेकर,सूर्यवंशी, नरवाडे, मेहूनकर तसेच पोलिस कर्मचारी यांच्या समवेत करण्यात आली

या कारवाईमुळे अवैध रेती उत्खनन करणाऱ्यांमध्ये भीती निर्माण झाली असून महसूल विभागाची ही धडक मोहीम पुढील काळातही सुरू राहणार असल्याची महसूल विभागाने सांगितले.

## पुण्यात नवीन दोन महापालिका होण्याचं काय झालं?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, पुणे :** मुंबई महानगराच्या हद्दीत एकापाठोपाठ नवनव्या महापालिकांची भर पडत असताना, पुणे महानगरातील नागरिकांना केवळ दोनच महापालिकांवर विसंबून राहावे लागते आहे. पुणे, पिंपरी-चिंचवडलगत हडपसर आणि चाकण अशा दोन नव्या महापालिका स्थापन करण्यासाठी राजकीय पक्ष, नेते, कार्यकर्ते अनुकूल असले, तरी सरकार निर्णय घेत नसल्याने विकासाचा असमतोल वाढत चालला आहे.

त्यामुळे निवडणुकांच्या या रणधुमाळीत तरी नव्या महापालिकांचा विषय प्रचाराचा भाग बनायला हवा, अशी पुणे व पिंपरी-चिंचवडकरांची अपेक्षा आहे. पुणे महापालिकेची स्थापना १९५० मध्ये झाली. पुण्यालगतच्या पिंपरी व परिसरामध्ये नागरीकरण झपाट्याने वाढू लागल्यानंतर तत्कालीन राज्यकर्त्यांनी भविष्याचा विचार करून १९८२ मध्येच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची स्थापना केली. त्यानंतरच्या गेल्या ४०-४३ वर्षांमध्ये पुणे आणि पिंपरी-चिंचवड ही दोन्ही शहरे व त्यालगतचा भाग आणखी विस्तारला. काही ठिकाणी अनिबंध वाढ झाली. त्यानंतर काही गावांचा समावेश महापालिकांमध्ये केला गेला. मात्र, महापालिकांच्या आजूबाजूचा परिसरही अत्यंत वेगाने वाढत असताना, आगामी २०-२५ वर्षांचा विचार करून आणखी दोन महापालिका स्थापन करण्याकडे राज्याचे नेतृत्व टाळाटाळ करताना दिसत आहे.

पुण्यालगतच्या परिसराची व्हायला झपाट्याने वाढ लागल्यानंतरच पूर्व पुण्यासाठी स्वतंत्र महानगरपालिकेची मागणी होऊ लागली. काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसचे तत्कालीन सरकार त्यासाठी सकारात्मक होते; पण विधानसभा निवडणुकीनंतर सत्तापालट झाल्याने वेगळ्या महापालिकेचा विषय मागे पडला. त्यानंतर, पुण्यातून हडपसर महापालिका वेगळी करण्याबाबत भाजप सरकारच्या काळातही चाचपणी झाली; परंतु तेव्हाही महापालिकेतील सत्ता जाण्याच्या भीतीने तसा निर्णय झाला नाही, याच दरम्यान महापालिकेच्या हद्दीलगतचा भाग पिंपरी-चिंचवड झपाट्याने वाढला. पुणे-नाशिक महामार्गावर चाकणमध्ये सर्वाधिक वाढ झाली. आजूबाजूच्या भागांतही नागरीकरण झाल्याने चाकणसाठी वेगळी महापालिका करण्याची मागणी जोर धरू लागली. निवडणुका लांबल्याने नव्या महापालिका स्थापण्यासाठी योग्य वातावरण होते. महापालिकेतील लोकप्रतिनिधींचा विरोध झाला नसता.

तरीही, चालढकल करण्यात आली. या कालावधीत राज्यात नव्याने काही महापालिकांची स्थापना झाली; परंतु पुण्याच्या मागण्यांकडे सत्ताधाऱ्यांनी दुर्लक्षच केले. विविध जाहीर कार्यक्रमांमध्ये आणि खासगी चर्चामध्येही वेगळ्या महापालिकांची गरज नेतेमंडळी मान्य करतात. निर्णय घेण्याची वेळ आल्यानंतर मात्र ते मागे हटत असल्याने वाढत्या नागरीकरणाचा आणि नागरिकांना विविध पायाभूत सुविधा पुरविण्याचा ताण दोन्ही महापालिकांवर येतो.

अक्षराज






## पैसा, प्रलोभनांचा हा खेळ सारा

महापालिका निवडणुकांच्या सुरू असलेल्या धामधुमीत गेल्या आठवड्यातील दोन महत्त्वाच्या बातम्या तशा फारशा चर्चेत आल्याच नाहीत. नुकत्याच झालेल्या त्र्यंबकेश्वर नगर परिषदेच्या निवडणूक प्रचारादरम्यान एका उमेदवाराने काही मतदारांना चक्क सोने वाटले होते. कोणी म्हणेल, काहीही सांगता राव! सोन्याचे दर काय आणि कोणी इतकी मौल्यवान वस्तू कशी वाटू शकेल? पण थांबा मतदारांना सोने वाटण्याची 'क्षमता' केवळ त्र्यंबकेश्वरमध्येच आहे.

नारायण नागबली हा धार्मिक विधी जगात एकमेव याच ठिकाणी होतो आणि बक्कळ पैसा झिरपतो. नगर परिषदांच्या मतसंग्रामात याच धार्मिक गावातील एका प्रभागात नगराध्यक्ष व दोन सदस्य अशा तीन मतांसाठी ३५ हजार रुपयांचा 'उच्चांक' गाठला गेला! तर निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर हे महाशय चक्क सोन्याचा ऐवज परत मागण्यासाठी दारोदारी फिरले. मग, दिलेले 'दान' कधी परत मागतात काय, म्हणत लोकांनी सुनावले. शिव्यांची लाखोली वाहिली. बिचारा, तोंड लपवत माघारी फिरला.

दुसरी घटना बहुदा ठाणे जिल्ह्यातील असावी. पराभव झाल्यानंतर एका उमेदवाराने वाटलेले पैसे त्याची धर्मपत्नी परत मागत होती. पैशांची मागणी करणारी ही दृश्यफीत अनेकांनी पाहिली असेल. या दोन्ही घटना वरकरणी मनोरंजक असल्या तरी निवडणूक काळातील प्रलोभने, पैशांचा होणारा अतिवापर आदींबाबत कोणाही सुजाणाला चिंतन करण्यास भाग पाडणाऱ्या. सत्तेच्या हव्यासापोटी राजकीय पक्ष व नेते मतांसाठी लाचार झाल्याने अवास्तव घोषणा करतात. लोकानुनयी राजकारणाची ही स्पर्धा घृणास्पदच. परंतु, मतदारही तशीच अपेक्षा करत असतील, तोच कित्ता गिरवत असतील तर अधिक चिंतेची बाब. सोने वाटणाऱ्याची साधी तक्रार करायला कोणी धजावत नसेल तर लोकशाही व्यवस्थेचे गोडवे तरी काय गायचे? पैसे वा इतर प्रलोभने हातात येईपर्यंत मतदानासाठी बाहेर न पडणाऱ्या झुंडीच्या झुंडी सर्वच शहरे आणि गावांतही दिसतात, ही सामाजिक अधोगती नव्हे काय? राजकारणाचा स्तर घसरला, तसा मतदारांचाही सामाजिक स्तर घरंगळणे, ही शोकांतिकाच. उच्चभ्रू सोसायट्यांतही इच्छुकांकडून पेव्हर ब्लॉक, सीसीटीव्ही, ठरावीक रकमेची मागणी, सामूहिक सहलीचे आयोजन किंवा पार्ट्यांची मेजवानी आदी प्रघातांचा महापालिकांच्या रणधुमाळीतही प्रत्यय येतो. निवडून येणारा पुन्हा इकडे फिरकणार नाहीच, याची खात्री असल्याने 'इन्स्टंट' हव्यासाचा 'ट्रेंड' रुजू पाहत असावा. नैतिकता, मूल्ये, निष्ठा, बांधिलकी वगैरेचा प्रत्यय तोंडदेखलाही येत नसेल तर हे कशाचे लक्षण?

महापालिकेसाठी राजकीय पक्षांनी घेतलेल्या मुलाखतीत 'खर्च किती कराल' हाच पहिला प्रश्न इच्छुकांना विचारला गेला. उमेदवाराचे समाजकार्य, चारित्र्य, जनसंपर्क आदी दुय्यम ठरले. इच्छुकांनी कोटी-दीड कोटीच्या खर्चाची आकडेमोड सहज करून दाखवली. गावपातळीवरच्या निवडणुकीत कोणी पाच-पन्नास लाख रुपये खर्च करणार असेल निवडून आल्यानंतर तो व्याजासह वसुली करणार नाही हे कशावरून? प्रत्येक निवडणुकीत पैशांच्या वाटपात वाढ होते आहे, हेच वास्तव. छोट्या महापालिकेतसुद्धा शंभर-सव्वाशे कोटी रुपयांची उलाढाल होत असेल तर राज्यातील २९ महापालिकांचा विचार केल्यास हा आकडा किती मोठा असेल? आचारसंहितेच्या बुजगावण्याला भिण्याचे दिवसही सरले. पूर्वी उमेदवारांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकांवर प्रकाशक, प्रतींची संख्या आदी तपशील हमखास असे. तसे नसेल तर कारवाईचा इशारा निवडणूक आयोगनामक यंत्रणा देई. आज एकाही पत्रकावर तसे उल्लेख नाहीत, तरीही काही देणेघेणे नसेल तर या यंत्रणेचे अस्तित्व औपचारिकता ठरते. त्यामुळेच की काय, समाजातील मोठ्या वर्गात निवडणुकांबाबत निरुत्साह वाढतो आहे. निवडणूक फडातील चुकीचे पायंडे आपल्याला परवडणारे नाहीत. पैसा, प्रलोभनांचा खेळ लोकशाहीच्या जीवावर बेतू नये म्हणजे मिळविले!

# मोबाईल ठरतोय पालकांसाठी डोकेदुखी !

सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे. या क्षेत्रात झपाट्याने होत जाणारे बदल आणि सुधारणा मानवी जीवनावर मोठ्या प्रमाणात परिणाम करत आहेत. तंत्रज्ञानात अपडेट असणाऱ्याला आज स्मार्ट समजले जाते ज्यामुळे वर्तमानात अशाच व्यक्तींना सन्मान दिला जातो. या बदलत्या तंत्रज्ञानाचा नोकरी व्यवसायात सुद्धा चांगलाच लाभ होताना दिसत आहे. तंत्रज्ञानाने जशी प्रगती केली तशा माणसाच्या गरजा आणि समस्या यांमध्येही बदल होत गेला.



आजमितीला मोबाइलशिवाय घराबाहेर पडणे असुरक्षित आणि अव्यवहार्य ठरू लागले आहे. त्याच्याशिवाय जगणे मुश्किल होऊ लागले आहे म्हणूनच कि काय मोबाइलशिवाय काही काळ घालवणे हे शौर्य ठरून बिग बॉस सारखे शोज निर्माण होऊ लागले. जेव्हा मोबाईल नव्हता तेव्हा मुले अभ्यास करत नाहीत, सारखी खेळत असतात ही पालकांची समस्या होती तर आज मुलं बाहेर खेळायलाच जात नाहीत, सारखी टीव्ही मोबाईलवर अडकून पडलेली असतात ही पालकांसाठी गंभीर समस्या बनली आहे. मोबाईलवर सोशल नेटवर्किंग साईटस आणि ऍप्स असले तरी त्या ऍप्समध्ये आपण इतके गुंतून गेलो आहोत कि आपल्या घराच्या आजूबाजूला काय चालले आहे हे सांगणारे मित्रच आपल्याकडे नाहीत. टीव्ही आणि मोबाईल यांच्या आहारी गेलेल्या आजच्या मुलांच्या आवडी निवडी, त्यांना काय हवे काय नको, त्यांचे रुसवे फुगवे, त्यांचे गुण दोष हे सारे काही मोबाईलच निश्चित करत आहे ज्यावर त्यांच्या पालकांचाही कंट्रोल नाही.

भारताची परिस्थिती पाहता भारतातील लहान मुलांकडून आज सोशल मीडियाचा आणि इंटरनेटचा बेसुमार वापर केला जात आहे ज्याचा परिणाम मुलांच्या आरोग्यावर होत आहे. हट्ट करणाऱ्या मुलाला शांत ठेवण्यासाठी किंवा त्याला वेळ घालवण्यासाठी पालक मंडळी आपले स्मार्ट फोन सर्रासपणे पाल्याच्या हाती देतात. काही महाभाग तर आपल्या मुलांना स्वतंत्र स्मार्टफोन्स उपलब्ध करून देतात. आज घरोघरी वायफाय आल्याने आणि इंटरनेट डाटाही स्वस्त झाल्याने या स्मार्टफोन्सवरील इंटरनेटचा मुले मुक्तपणे वापर करताना दिसतात. ऑनलाईन व्हिडीओ गेम्स खेळण्यात आणि रिल्स पाहण्यात ती तासनतास रमतात.

रिल्सना वयाचे बंधन नसल्याने हिंस्त्र स्वरूपाचे, अश्लील कंटेंट आणि संवाद असलेले, शिव्यांचा मुक्त वापर केलेले रिल्स मुलांच्या पाहण्यात येतात. सातत्याने असे रिल्स पाहिल्याने त्याचे मुलांच्या कोवळ्या मनावर विपरीत परिणाम होतात. रिल्समध्ये ऐकलेल्या शिव्या मुलेही एकमेकांना देऊ लागतात. ज्यामुळे मुलांमध्ये भांडणे होऊन त्याचा पालकांच्या डोक्याला ताप होतो. लॉकडाऊनच्या काळात मुलांचे शिक्षण थांबायला नको म्हणून ऑनलाईन शिक्षणाचा पर्याय निवडण्यात आला होता ज्यामुळे प्रत्येक मुलाच्या हातात स्मार्टफोन आला.

या प्रदीर्घ कालावधीत स्मार्टफोन वापरण्यात मुले पारंगत झाली; मात्र शिक्षणाव्यतिरिक्त मनोरंजनाचे प्रचंड मोठे दालन या हातात मावणाऱ्या स्मार्टफोनमध्ये सामावले असल्याचे मुलांना लहान वयातच ज्ञात झाल्याने मुले मनोरंजनाच्या आणि खेळाच्या अन्य साधनांपेक्षा स्मार्ट फोन्समध्ये अधिक रमु लागली आहेत. स्मार्ट फोन्सच्या अतिवापरामुळे मुलांमध्ये चिडचिड करणे, राग येणे, सूड भावनेने वागणे, तुलना करणे. मनोराज्यात रमणे यांसारखे दोष वाढले आहेत. इतरांच्या तुलनेत स्मार्ट फोन्स वापरणाऱ्या मुलांमध्ये अपमानाचे आणि आत्महत्येचे विचार अधिक प्रमाणात येत असल्याचेही एका सर्वेक्षणातून सिद्ध झाले, त्यामुळेच गेल्या काही वर्षांत लहान मुलांच्या आत्महत्येचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. अधिक प्रमाणात कार्टून्स बघून मुले त्यातील पात्रांप्रमाणेच वागू लागतात. मुलांच्या मानसिक आरोग्यावर स्मार्ट फोन्सचा विपरीत परिणाम होतो, त्यांची शारिरिक आणि बौद्धिक वाढही खुंटते. पौगंडावस्थेतील मुले स्मार्ट फोन्सवरील रिल्स आणि हिंसक दृश्ये पाहून व्यसनाच्या आहारी जाऊ लागल्याचेही निरीक्षणातून सिद्ध झाले आहे. गेल्या काही काळात सायबर गुन्हेगारीचे प्रमाण वाढले असून या सायबर गुन्हेगारीलाही मुले बळी पडू लागली आहेत. स्मार्ट फोन्सचा अति वापर मुलांमध्ये शिक्षणाविषयी, मैदानी खेळाविषयी रुची कमी करतो.

मुलांच्या मेंदूचा विकासही स्मार्ट फोनच्या अतिवापरामुळे खुंटतो. मुली भावनाशील असल्याने स्मार्ट फोनचा अधिक वापर करणाऱ्या लहान मुलींच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर लवकर परिणाम होतो. जगभरातील हवी ती माहिती चुटकीसारखी उपलब्ध करून देणारा स्मार्ट फोन स्वतः स्मार्ट असला तरी त्याच्या अतिवापरामुळे लहान मुलांचे आरोग्य आणि भवितव्य धोक्यात आले आहे हे निश्चित. आधुनिक जीवनाचा अविभाज्य भाग असणाऱ्या स्मार्ट फोनपासून मुलांना पूर्णपणे दूर करूनही चालणार नाही; मात्र आजमितीला प्रत्येक पालकांनी आपल्या मुलांचा स्क्रीन टाइम निश्चित करणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे ऑस्ट्रेलियाने आपल्या देशात मुलांच्या स्मार्ट फोन वापरावर बंधने आणली, तशा प्रकारची बंधने भारततही आणण्याची आज नितांत गरज आहे.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# मागणी तसा पुरवठा !

## वाचक पत्र

मागणी तसा पुरवठा हा अर्थशास्त्राचा मूलभूत नियम सात्विक किंवा नैसर्गिक उत्पादनांच्या बाबतीत सध्या प्रकर्षाने दिसून येत आहे. जशी लोकांची जीवनशैली बदलत आहे, तशी शुद्ध आणि सात्विक अन्नाची मागणी वाढत असून बाजारपेठही त्यानुसार विस्तारत आहे. याची काही प्रमुख उदाहरणे म्हणजे सेंद्रिय शेती (Organic Farming). रासायनिक खते आणि कीटकनाशकांमुळे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेऊन ग्राहक आता 'ऑरगॅनिक' भाज्या आणि फळांकडे वळले आहेत. यामुळेच आज शहरांमध्ये खास सेंद्रिय उत्पादनांची दुकाने आणि 'शेतकरी ते ग्राहक' थेट बाजारपेठांची संख्या वाढली आहे.

दुसरे म्हणजे ए२ दूध आणि दुग्धजन्य पदार्थ. आरोग्याबद्दलच्या जागरूकतेमुळे साध्या दुधाऐवजी देशी गायीच्या (A2) दुधाला मागणी वाढली आहे. दहा वर्षांपूर्वी शहरात शुद्ध देशी गायीचे तूप विकत मिळणे दुरापास्त होते. आता मात्र मागणी निर्माण झाल्याने अनेक गोशाळा आणि स्टार्टअप्स शुद्ध तूप, ताक आणि दुधाचा पुरवठा करण्यासाठी पुढे आले आहेत. व गल्लीबोळातही ही उत्पादने उपलब्ध झाली आहेत. थोडक्यात सांगायचे तर, 'आरोग्य हीच संपत्ती' हा विचार करून जेव्हा ग्राहक सात्विक पर्यायांची निवड करतो, तेव्हा उत्पादक आणि शेतकरीही त्याच प्रकारच्या उत्पादनांच्या निर्मितीवर भर देतात. यामुळेच मागणी आणि पुरवठ्याचे हे चक्र पर्यावरण आणि मानवी आरोग्यासाठी पूरक ठरत आहे.

हाच नियम नैसर्गिक जीवनशैली, संस्कृती, धार्मिकता यांनाही लागू होतो. हल्ली चित्रपटगृहात प्रदर्शित होणारे बरेचसे चित्रपटही राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लावणारे आहेत. 'दुनिया बदलती है, बदलाव लानेवाला चाहिए ।' तरुणाईनेच बाजारपेठेला दिशा दिली पाहिजे कारण... 'यह नया भारत है ।'

**- सौ स्वाती हरेर**
**मुंबई**

## बंड

जागाअसेमर्यादित
इच्छुक अति प्रचंड
अपेक्षित हे सकला
होणारं निश्चित बंड

नक्की येवू जिंकून
अपेक्षासुध्दा उदंड
अपक्ष म्हणून खडे
थोपटून आपलेदंड

आवर असे कठिण
सत्तेचा विचित्र कंड
सांगणे केवळ सोपे
एकजूट ठेवे अखंड

नाकारले तिकीट रे
दिला कसा उग्र दंड
घाम गाळला सतत
कामेकेलेली औदंड

पदरमोड करे काही
ना मागता पक्ष फंड
आव्हान पक्षश्रेष्ठींस
पहावे कर्तृत्वउतरंड

कामआता रे क्लिष्ट
कसे शांतकरावे बंड
अन्यथा बदली चित्र
अकारण होई कदंड

प्रति पक्षातून मुद्दाम
पाठवले जाती वांड
अपयशा नंतर जाणे
कसले कुणाचे कांड

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

# बीसीसीआयकडून बांगलादेश क्रिकेटला आणखी एक धक्का

बांगलादेशमधील वाढत्या हिंसाचार आणि परिस्थितीमुळे बीसीसीआयने २०२५ नियोजित दौरा रद्द केला होता. त्यानंतर पुन्हा एकदा वेळापत्रक जाहीर करण्यात आलं आहे. पण बीसीसीआयने पुन्हा एकदा बांगलादेशला ठेंगा दाखवला आहे. सुरक्षेचं कारण देत स्पष्ट भूमिका मांडली आहे.




टीम इंडिया २०२५ मध्ये बांगलादेशचा दौरा करणार होती. भारतीय संघ एकदिवसीय आणि टी२० मालिका खेळणार होता. मात्र बांगलादेशमध्ये झालेल्या हिंसाचारामुळे बीसीसीआयने टीम इंडियाचा दौरा पुढे ढकलला. बांगलादेश क्रिकेट बोर्डाच्या माहितीनुसार क्रिकबझने वृत्त दिले की, टीम इंडिया सप्टेंबरमध्ये बांगलादेशचा दौरा करेल आणि या दौऱ्यात तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका आणि तीन सामन्यांची टी२० मालिका असेल.बांगलादेश क्रिकेट बोर्डाच्या माहितीनुसार क्रिकबझने वृत्त दिले की, टीम इंडिया सप्टेंबरमध्ये बांगलादेशचा दौरा करेल आणि या दौऱ्यात तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका आणि तीन सामन्यांची टी२० मालिका असेल. भारताच्या दौऱ्याचं वृत्त आल्यानंतर बीसीसीआयकडून तात्काळ घडामोडी समोर आल्या आहेत. आयपीएलमधून मुस्तफिझुर रहमानची हकालपट्टी केली आहे. इंडियन एक्स्प्रेसच्या वृत्तानुसार, नव्याने आयोजित केल्याचे दौरा पुढे ढकलला आहे.

भारताच्या दौऱ्याचं वृत्त आल्यानंतर बीसीसीआयकडून तात्काळ घडामोडी समोर आल्या आहेत. आयपीएलमधून मुस्तफिझुर रहमानची हकालपट्टी केली आहे. इंडियन एक्स्प्रेसच्या वृत्तानुसार, नव्याने आयोजित केल्याचे दौरा पुढे ढकलला आहे. बीसीसीआयने ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये होणारा बांगलादेश दौरा तात्पुरता पुढे ढकलला आहे, असे इंडियन एक्सप्रेसने बीसीसीआयच्या सूत्रांचा हवाला देत वृत्त दिले आहे. बोर्ड आता या विषयावर भारत सरकारशी चर्चा करेल आणि त्यांच्या सल्ल्यानुसार पुढील निर्णय घेईल.

बीसीसीआयने ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये होणारा बांगलादेश दौरा तात्पुरता पुढे ढकलला आहे, असे इंडियन एक्सप्रेसने बीसीसीआयच्या सूत्रांचा हवाला देत वृत्त दिले आहे. बोर्ड आता या विषयावर भारत सरकारशी चर्चा करेल आणि त्यांच्या सल्ल्यानुसार पुढील निर्णय घेईल. बीसीसीआयने हा दौरा पुढे ढकलला तर बीसीबीचे मोठे नुकसान होऊ शकते. आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या बांगलादेश बोर्डाला भारत दौऱ्यातून महसूल मिळण्याची अपेक्षा होती. परंतु हा दौरा रद्द केल्याने बांगलादेश बोर्डाला प्रायोजकत्व आणि प्रसारण करारांमध्ये लाखो रुपयांचे नुकसान होऊ शकते.

बीसीसीआयने हा दौरा पुढे ढकलला तर बीसीबीचे मोठे नुकसान होऊ शकते. आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या बांगलादेश बोर्डाला भारत दौऱ्यातून महसूल मिळण्याची अपेक्षा होती. परंतु हा दौरा रद्द केल्याने बांगलादेश बोर्डाला प्रायोजकत्व आणि प्रसारण करारांमध्ये लाखो रुपयांचे नुकसान होऊ शकते.

# ५ वर्षांचा मुलगा बनला दोन मुलांचा बाप

देशामध्ये मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रिया सुरू झाली आहे, एसआयआर सुरू असताना मोठा गोंधळ समोर येत आहे. मध्यप्रदेशपासून ते पश्चिम बंगालपर्यंत एसआयआर सुरू आहे. याच दरम्यान पश्चिम बंगालमधून एक धक्कादायक प्रकरण समोर आलं आहे. ज्यामुळे या गावात राहणाऱ्या लोकांना प्रचंड धक्का बसला आहे. पूर्व बर्धमान जिल्ह्यात ही घटना घडली आहे. या घटनेमुळे पुन्हा एकदा निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झालं आहे. निवडणूक आयोगाच्या रेकॉर्डमध्ये एका पाच वर्षांच्या मुलाला दोन मुलांचे वडील असल्याचं दाखवण्यात आलं आहे. मात्र जेव्हा ही गोष्ट तेथील प्रशासनाला कळाली तेव्हा चांगलाच गोंधळ उडाला या घटनेच्या चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.

ही घटना पूर्व बर्धमान जिल्ह्यातल्या मंगलकोट पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या शीतल गावमध्ये घडली आहे. एसआयआर दरम्यान एका कुटुंबाचं मतदार यादीतील नाव चेक करत असताना हा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. निवडणूक आयोगाकडून झालेली ही चूक संपूर्ण जिल्ह्यात चर्चेला विषय बनली आहे. निवडणूक आयोगाच्या मतदार यादीनुसार सरोज मांझी यांचं वय ६३ वर्ष आहे, तर त्यांचे दोन कथित मुलं लक्ष्मी मांझी यांचं वय ५९ आणि सागर मांझी यांचं वय ५८ वर्ष एवढं आहे, याचाच अर्थ सरोज मांझी हे केवळ आपल्या दोन्ही मुलांपेक्षा फक्त पाच वर्षांनी मोठे आहेत. म्हणजेच ते पाचव्याच वर्षीच दोन मुलाचे वडील बनले आहेत, जे की हे अशक्य आहे. हे प्रकरण शीतल गावामधील बूथ क्रमांक १७५ शी संबंधित आहे, एसआयआर अंतर्गत कागदपत्रांचं व्हेरिफिकेशन सुरू आहे, याचदरम्यान हा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. धक्कादायक म्हणजे हे प्रकरण समोर येताच सरोज मांझी यांच्या दोन कथित मुलांनी धक्कादायक कबुली दिली आहे. आम्ही सरोज मांझी यांचे मुलं नसून, आम्ही त्यांच्या नावाचा वापर केला आहे, परंतु आमचं मुळ गावं हे बांगलादेशात आहे, आम्ही २२ वर्षांपूर्वी आधी पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद येथे आलो आणि त्यानंतर कामाच्या शोधात मंगलकोटमधील शीतल गावात आलो अशी कबुली त्यांनी दिली आहे, आणि त्यानंतर आमच्या नावाचा मतदार यादीमध्ये समावेश देखील झाला, असं त्यांनी म्हटलं आहे. या प्रकरणामुळे खळबळ उडाली आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज



## थोडक्यात

### विंचूरच्या चौंडेश्वरी मंदिरात शाकंभरी पौर्णिमा उत्साहात; महाप्रसादाला भाविकांचा उदंड प्रतिसाद



**अक्षराज : सुनील क्षीरसागर**

**दि.०३, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील ग्रामदैवत श्री चौंडेश्वरी देवी मंदिरात शाकंभरी पौर्णिमा उत्सव मोठ्या भक्तीमय वातावरणात आणि उत्साहात संपन्न झाला. सालाबादप्रमाणे यंदाही कोष्टी समाजाच्या वतीने या उत्सवाचे नेटके आयोजन करण्यात आले होते. शनिवार, दि.०३ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता देवीची विधिवत महाआरती करण्यात आली. त्यानंतर कोष्टी समाजाच्या वतीने भाविकांसाठी भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. कोष्टी समाजाचे अध्यक्ष राजेंद्र विभूते यांनी विंचूर व पंचक्रोशीतील सर्व मान्यवर आणि ग्राम स्थांना महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत हजारो भाविकांनी शिस्तबद्ध रीतीने महाप्रसादाचा लाभ घेतला. हा संपूर्ण सोहळा यशस्वी करण्यासाठी कोष्टी समाजातील सर्व बांधवांनी विशेष परिश्रम घेतले. भक्तीमय वातावरणात आणि कोष्टी समाज बांधवांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम निर्विघ्नपणे पार पडला.

### मराठी पत्रकार संघ पंढरपूर शहर आणि तालुक्याची २०२६-२७ कार्यकारिणी जाहीर



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०३, पंढरपूर :** पंढरपूर येथील पत्रकार भवन या ठिकाणी राज्य मराठी पत्रकार संघ पंढरपूरच्या शहर आणि तालुका पदाधिकारी व सदस्यांची बैठक संघाचे प्रदेशाध्यक्ष किरण जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली व राज्य सचिव हरिभाऊ प्रक्षाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी संपन्न झाली.

या बैठकीत राज्य सचिव हरिभाऊ प्रक्षाळे आणि ज्येष्ठ पत्रकार राजाभाऊ शहापूरकर यांनी पंढरपूर शहरातील व तालुक्यातील मराठी पत्रकार संघातील सदस्य व पदाधिकारी यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा केली. आणि आगामी सण २०२६ - २७ करिता या पत्रकार संघाच्या नवीन कार्यकारणी जाहीर करण्यात आली. यामध्ये मराठी पत्रकार संघाच्या पंढरपूर शहराध्यक्षपदी दैनिक एकमतचे तालुका प्रतिनिधी अपराजित सर्वगोड तर तालुका अध्यक्षपदी दैनिक पुण्यनगरीचे मिलिंद यादव यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तसेच

याप्रसंगी पंढरपूर येथे उभारण्यात येणाऱ्या मीडिया टावर बाबत तसेच विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. मराठी पत्रकार संघाच्या नूतन कार्यकारणी मध्ये शहर उपाध्यक्ष अमोल माने, दगडु कांबळे, शहर सचिव दत्ता पाटील, शहर कार्याध्यक्ष रामकृष्ण बिडकर, शहर खजिनदार सचिन माने, शहर प्रसिद्धी प्रमुख कबिर देवकुळे यांची निवड करण्यात आली तर पंढरपूर तालुका उपाध्यक्ष बालम मुलाणी, तालुका कार्याध्यक्ष अमोल कुलकर्णी, तालुका सचिव अरुण जाधव, तालुका खजिनदार सावता जाधव, तालुका प्रसिद्धीप्रमुख विनोद पोतदार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. याप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार राजाभाऊ शहापूरकर, पत्रकार कल्याण कुलकर्णी, विकास पवार, संजय कोकरे, राजेंद्र ढवळे, सागर आतकरे, नवनाथ खिलारे, अमोल गुरव, नेताजी शिंदे, संतोष चंदनशिवे, प्रकाश सरताळे, संतोष कसगावडे, संजय यादव, प्रदीप आसबे यांच्यासह मराठी पत्रकार संघाचे पत्रकार बांधव उपस्थित होते.

### विसापूर ग्रामपंचायत तर्फे सावित्रीबाई फुले यांना अभिवादन



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०३, चंद्रपूर :** १ जानेवारी १८४८ मध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी पहिली मुलींची शाळा सुरु करून महिलांसाठी शिक्षणाचे दालन उघडले. आद्य महिला शिक्षिका म्हणून त्यांचा गौरव आहे. त्यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून बल्लारपूर तालुक्यातील विसापूर ग्रामपंचायत मध्ये त्यांच्या प्रतिमेला मालार्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपसरपंच अनेकश्वर मेश्राम होते, तर प्रमुख अतिथी म्हणून माजी उपसरपंच सुनिल रोंगे, ग्रामपंचायत सदस्य गजानन पाटणकर, सुरेखा ईटनकर, विद्या देवाळकर, शशीकला जीवने, रिना कांबळे, हर्षला टोंगे, वैशाली पुणेकर, ग्रामपंचायत लिपिक संतोष निपुंगे, राहूल टोंगे, सुरज डबरे, अशोक ठुणेकर यांची उपस्थिती होती. दरम्यान, मान्यवरांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या रेल्वे चौकातील पुतळ्यांना मालार्पण करून अभिवादन केले. त्याचप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला मालार्पण करून अभिवादन करण्यात आले.

### अक्षरज्ञान प्रतिष्ठान तर्फे वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशनला बॅरिकेट्स भेट




**अक्षराज : शरद भगत**

**दि.०३, वडगांव निंबाळकर :** पुणे ग्रामीण पोलीस आणि वडगांव निंबाळकर पोलीस स्टेशन अंतर्गत, करंजेपूल पोलीस दुरशेत्र यांच्या मार्गदर्शनाखाली, आपल्या गावातील अक्षरज्ञान प्रतिष्ठान यांच्या वतीने सामाजिक बांधिलकीतून करंजेपूल पोलीस दुरशेत्रचे PSI राहुल साबळे आणि श्री. नागटिळक यांच्या मार्गदर्शनाखाली मोरगाव -निरा रोडवरील अतीवेगाने जाणाऱ्या गाड्या आणि वाढते अपघातांचे प्रमाण लक्षात घेता बॅरिकेट्स देण्यात आले. आज नारळ वाढवून लोकार्पण करण्यात आले. यावेळी श्री.साबळे यांनी प्रतिष्ठानचे आभार मानले. यावेळी गावातील युवक आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## स्वीप उपक्रमात नवी मुंबईतील विद्यार्थ्यांनी हस्तकला, रांगोळी प्रदर्शनातून दिला मतदानाचा संदेश



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०३, नवी मुंबई :** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीत मतदानाची टक्केवारी वाढावी याकरिता नागरिकांमध्ये मोठया प्रमाणावर जनजागृती करण्यात येत आहे. महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व्यापक प्रमाणात मतदार जागरुकता आणि सहभाग कार्यक्रम (डतएएझ - ड्रींशारींळल तींशऔ' एर्वीलरींळेप रपव एश्रशलींऑरश्र झरऔंळलळरींळेप) राबविण्यात येत आहे. यामध्ये विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचा अंतभाव करण्यात आलेला आहे.स्वीप कार्यक्रमांतर्गत शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सहभागातून विविध प्रकारचे मतदान जागृती उपक्रम राबविले जात आहेत. या उपक्रमांतून विद्यार्थ्यांमधील अंगभूत कलागुणांना उत्तेजन मिळावे व त्या माध्यमातून निवडणूकीत मतदानाचा हक्क बजावण्याचा संदेश प्रसारित व्हावा अशाप्रकारे अभिनव उपक्रमांचे आयोजन केले जात आहे.कोपरखैरणे से.७ येथील नवी मुंबई महानगर पालिकेची शाळा क्र.३१ नेहमीच वेगळ्या प्रकारचे कार्यक्रम कल्पकतेने आयोजित करीत असल्यामुळे सांस्कृतिक उपक्रमांची जपणूक करणारी शाळा म्हणून ओळखली जाते.

१५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने शाळेच्या मुख्याध्यापिका व शिक्षकवृंद यांनी हस्तकला व रांगोळी कलेला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने प्रदर्शनाचे आयोजन केले होते. या हस्तकला प्रदर्शन आणि रांगोळी प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभागी होत वेगवेगळया प्रकारच्या वस्तू निर्माण केल्या तसेच कागदी पिशव्या, पतंग अशा टाकाऊ पासून टिकाऊ वस्तूंवर व त्याठिकाणी काढलेल्या आकर्षक रांगोळीवर मतदानाचे आवाहन करणारे संदेश चितारुन मतदानाविषयी जनजागृतीही केली.

शिक्षण विभागाच्या उपआयुक्त संघरत्ना खिल्लारे व निवडणूक विषयक स्वीप कार्यक्रमाचे नोडल अधिकारी उपआयुक्त डॉ.अजय गडदे यांच्या मार्गदर्शनानुसार शिक्षण विस्तार अधिकारी सुलभा बारघरे यांनी पुढाकार घेत शाळेच्या मुख्याध्यापिका व शिक्षकांसह हा उपक्रम यशस्वी केला. विशेष म्हणजे यावेळी ९-१० चे २३० विद्यार्थी आणि इयत्ता ८ वीचे ११० विद्यार्थी यांनी शाळेच्या परिसरात मतदान जागृती विषयी रॅली काढून १०० टक्के मतदानाचे आवाहन केले. 'मतदार राजा जागा हो - लोकशाहीचा धागा हो', 'प्रत्येक मतदार - लोकशाहीचा आधार', 'जबाबदारीने करा मतदान - राखा संविधानाचा सन्मान' अशा विविध घोषणा देत व घोषणांचे फलक उंचावत काढलेल्या मतदान जागृती रॅलीमध्ये विद्यार्थ्यांसह त्यांचे पालकही उत्साहाने सहभागी झाले होते. यावेळी मार्केट क्षेत्रात जाऊन तेथील दुकानदार व ग्राहक तसेच रस्त्यावरील नागरिक यांच्यामध्ये ही मतदान विषयक जागृती करण्यात आली.

# महात्मा फुले चौक पोलीस ठाण्याची मोठी कारवाई

## अवघ्या २४ तासांत अज्ञात महिलेच्या खुनाचा पर्दाफाश; सासू व तिचा मित्र अटकेत

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०३, कल्याण (ठाणे) :** महात्मा फुले चौक पोलीस ठाणे हद्दीत वालधुनी नदी पुलाखाली आढळलेल्या अज्ञात महिलेच्या मृत्यू प्रकरणाचा ठाणे शहर पोलीसांनी अवघ्या २४ तासांत यशस्वी उलगडा केला आहे. मृत महिलेची ओळख श्रीमती रुपाली विलास गांगुर्डे (वय ३५, रा.न्यू जिम्मीबाग, कर्पेवाडी, कोळशेवाडी, कल्याण पूर्व) अशी निष्पन्न झाली असून, आर्थिक व कौटुंबिक वादातून तिची निर्घृण हत्या करण्यात आल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. दि.०३ जानेवारी २०२६ रोजी महात्मा फुले चौक पोलीस ठाण्यास आरपीएफ रेल्वे कर्मचाऱ्यांकडून वालधुनी पुलाखाली रोडच्या बाजूला एका महिलेचा रक्तबंबाळ अवस्थेत मृतदेह पडल्याची माहिती प्राप्त झाली. माहिती मिळताच पोलीस अधिकारी व अंमलदार तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. सदर महिलेस उपचारासाठी रुक्मिणीबाई रुग्णालय, कल्याण येथे हलविण्यात आले, मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.

या प्रकरणी अकस्मात मृत्यू रजि. नं. ०२/२०२६ भा.न्याय संहिता २०२३ चे कलम १९४ प्रमाणे नोंद करण्यात आली. मृतदेहावर डोक्यावर, चेहऱ्यावर, डोळ्याजवळ व हातावर गंभीर जखमा आढळून आल्याने या मृत्यूचे गांभीर्य लक्षात घेऊन सखोल तपास सुरू करण्यात आला. तपासाची जबाबदारी पोलीस निरीक्षक (गुन्हे) विजय नाईक यांच्याकडे सोपविण्यात आली.

तपास सुरू असतानाच लताबाई नाथा गांगुर्डे (वय ६०) या महात्मा फुले चौक पोलीस ठाण्यात हजर झाल्या. त्यांनी त्यांची सून रुपाली गांगुर्डे ही दि. १ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी घरातून निघून गेल्यानंतर परत न आल्याची माहिती देत तिचा फोटो पोलिसांना दाखविला. सदर फोटो अकस्मात मृत्यू प्रकरणातील अनोळखी महिलेच्या मृतदेहाशी जुळत असल्याचे निष्पन्न झाले. मृतदेहाचे फोटो दाखविल्यानंतर लताबाई यांनी सदर मयत महिला ही त्यांचीच सून रुपाली गांगुर्डे असल्याचे मान्य केले. त्यानंतर पोलिसांनी लताबाई गांगुर्डे यांच्याकडे अधिक सखोल चौकशी केली असता धक्कादायक माहिती समोर आली. लताबाई यांचा मुलगा विलास गांगुर्डे हा रेल्वे विभागात कार्यरत असून त्याचा सप्टेंबर २०२५ मध्ये मृत्यू झाला होता.

मृत्यूनंतर रुपाली गांगुर्डे हिला सुमारे ९ ते १० लाख रुपयांची आर्थिक मदत मिळाली होती. तसेच अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्याच्या कारणावरून सासू-सून यांच्यात वाद सुरू होते. या आर्थिक व नोकरीच्या वादातून लताबाई गांगुर्डे व त्यांचा मित्र जगदीश महादेव म्हात्रे (वय ६७, रा. वरपगाव, ता. कल्याण) यांनी संगनमत करून रुपाली गांगुर्डे हिची हत्या केल्याचे निष्पन्न झाले.

दि.०१ जानेवारी २०२६ रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास कोळशेवाडी येथील श्रीनिवास चाळीत लोखंडी रॉडने रुपाली गांगुर्डे हिच्या डोक्यावर, चेहऱ्यावर व हातांवर जोरदार वार करून तिची हत्या करण्यात आली. त्यानंतर पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने रक्ताने माखलेले कपडे व घरातील रक्ताचे डाग साफ करून मृतदेह वालधुनी पुलाखाली फेकून देण्यात आला. या प्रकरणी महात्मा फुले चौक पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ००९/२०२६ भा. न्याय संहिता २०२३ चे कलम १०३ (खून), २३८ (पुरावा नष्ट करणे), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक (प्रशासन) सोपान नांगरे करीत आहेत. ही उल्लेखनीय कामगिरी अपर पोलीस आयुक्त संजय जाधव, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३ अतुल झेंडे, सहायक पोलीस आयुक्त कल्याण विभाग कल्याणजी घेटे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच गुन्हे शोध पथकातील अधिकारी व अंमलदारांच्या संयुक्त प्रयत्नातून पार पडली आहे.

## पोलीस रेझिंग डे निमित्त बल्लारपूर पोलीस स्टेशनचे जनजागृती कार्यक्रम तसेच सावित्रीबाई फुले जयंती साजरी



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०३, बल्लारपूर (चंद्रपूर) :** सेवा, शौर्य, समर्पण व विश्वास या ब्रीद वाक्य अंतर्गत महाराष्ट्र पोलीस दलाचा रेजिंग डे बल्लारपूर शहर पोलीस स्टेशनच्या वतीने विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात येत आहे. या निमित्ताने दिनांक ०२ जानेवारी ते ०८ जानेवारी २०२६ रोजी या कालावधीत नागरिकांमध्ये कायद्याबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने विविध जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या प्रारंभी दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी वियाणी शाळा बल्लारपूर येथील विद्यार्थ्यांना बल्लारपूर शहर पोलीस स्टेशन येथे बोलवण्यात आले होते. यावेळी शाळेतील एकूण ३० विद्यार्थी कार्यक्रमाला उपस्थित होते. यावेळी पोलीस निरीक्षक बिपिन इंगळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच पोलीस दलातील विविध शस्त्रांची प्रात्यक्षिक रित्या माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी सर्व साधनांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला तसेच त्यांनी पोलीस स्टेशनच्या अंतर्गत वापरात असलेल्या विविध वाहनांचीनांची माहिती उदा. डायल ११२, पिटर मोबाइल, सेकंड मोबाईल इ. देण्यात आली. आपत्कालीन कार्य, शहरातील विविध भागातील पेट्रोलिंग व्यवस्था तसेच महिलांच्या सुरक्षितेची व शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे सुरक्षेतेच्य जनजागृती बाबत थोडक्यात माहिती देण्यात आली.

यावेळी पोलीस स्टेशन मधील पोलीस उपनिरीक्षक सलीम शेख यांनी विद्यार्थ्यांना पोलीस स्टेशनच्या दैनंदिन कामकाजाची सविस्तर माहिती दिली. यामध्ये डीबी कक्ष, गोपनीय कक्ष, सेशन पथक, निर्भया पथक, महिला संरक्षण कक्ष, वायरलेस रूम, मुद्देमाल कक्ष, पुरुष आरोपी व महिला आरोपी लॉकअप, सायबर कार्यालय, वाहतूक कार्यालय व अर्ज शाखा याबाबत माहिती देऊन विविध विभागाचे कार्य समजावून सांगण्यात आले. तसेच महिला पोलीस उपनिरीक्षक मोरे यांनी पोस्को कायदा, महिलांची व मुलींची छेडछाड, बाल लैंगिक अत्याचार या संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दरम्यान सायबर शाखेचे पोलीस अंमलदार सचिन राठोड व भास्कर चिंचोलकर यांनी विद्यार्थ्यांना सोशल मीडियाच्या गैरवापर बाबत सूचना देत १८ वर्षाखालील मुला- मुलींनी इंस्टाग्राम, व्हॉट्सअॅप व फेसबुक अकाउंट चा वापर करू नये तसेच सोशल मीडियावरील गैरवापराची माहिती पोलीस यंत्रणेकडे उपलब्ध असते असे स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी शिक्षणाकडे लक्ष द्यावे असेही त्यांना सांगितले. हा संपूर्ण कार्यक्रम चंद्रपूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक व मुमक्का सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे तसेच राजुरा उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर नंदनवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडला.

पोलीस स्टेशन बल्लारपूर तर्फे सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विपीन इंगळे पोलीस निरीक्षक बल्लारपूर यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण व दीप प्रज्वलन करून अभिवादन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पोलीस निरीक्षक विपिन इंगळे साहेब, पोलीस निरीक्षक राजेंद्र गायकवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक मदन दिवटे, पोलीस उपनिरीक्षक सय्याम, पोलीस उपनिरीक्षक सलीम शेख, पोलीस उपनिरीक्षक उमेश जोगदंड, मुद्देमाल कक्षाचे पोलीस उपनिरीक्षक मनोहर मडावी, वाहतूक शाखेचे पोलीस स्टाफ, गोपनीय कक्षाचे पोलीस हवालदार महेंद्र वन्नकवार व त्यांचा स्टाफ, डीपी पथकाचे पोलीस स्टॉफ, पोस्को पथकाचे महिला अधिकारी मोरे व त्यांचा स्टाफ, महिला कर्मचारी कल्याणी पाटील, अर्चना, प्रज्ञा कांबळे तसेच वियाणी शाळेचे शिक्षक अनिल चापले, सोनाली आमटे व विद्यार्थी यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सहकार्य केले.

अक्षराज



# खेळातून मन आणि मनगट मजबूत होते - आ.रत्नाकर गुट्टे

## फरकंडा येथे श्री बळीराजा ग्रामीण क्रीडा महोत्सवाचे उदघाटन

**अक्षराज : बाळासाहेब फुलपगार**

**दि.०२, पालम (परभणी) :** विद्यार्थ्यांच्या विकासात अभ्यासासोबतच खेळाचे अत्यंत महत्त्व आहे. अभ्यासाने विद्यार्थ्यांचा मेंदू सक्षम होतो. त्याचप्रमाणे खेळ जीवनात आवश्यक आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे मन आणि मनगट मजबूत होते.

राष्ट्रीयरत्न भाई लक्ष्मणराव गोळेगावकर यांनी बळीराजा ग्रामीण क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून ग्रामीण खेळांचे केलेले जतन ऐतिहासिक आहे. प्रतिपादन गंगाखेडचे आ.रत्नाकर गुट्टे यांनी दिनांक ०२ जानेवारी २०२६ रोजी केले. ते तालुक्यातील फरकंडा येथील जय क्रांती हायस्कूलमध्ये श्री बळीराजा शिक्षण संस्था सोमेश्वर आयोजित ४० व्या श्री बळीराजा ग्रामीण क्रीडा महोत्सव २०२६ चे उद्घाटन करताना बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बळीराजा परिवाराचे अध्यक्ष तुषार भैय्या




गोळेगावकर हे होते.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिप सभापती चित्राताई गोळेगावकर, उपाध्यक्ष योगीराज गोळेगावकर, संचालक अक्षयाताई गोळेगावकर, कोषाध्यक्ष दिलीपराव दुधाटे, प्रेमाताई कदम, माजी नगराध्यक्ष वसंत सिरस्कर, माजी सभापती रत्नाकर शिंदे, नगराध्यक्ष प्रतिनिधी इमदाद पठाण, गटविकास अधिकारी ऋषिकेश सावंत, उपनगराध्यक्ष भास्करराव सिरस्कर, जालींदर हत्तीअंबीरे, श्रीकांत गायकवाड, सरपंच शोभाबाई जोंधळे, उपसरपंच कौशल्याबाई पौळ, संदीप आळनुरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना आ.गुट्टे म्हणाले की, देशाच्या विकासात विद्यार्थी हा महत्वाचं घटक असतो. त्याचा सर्वांगीण विकास होणे गरजेचे असते त्यासाठी खेळ म हत्त्वाचा आहे. त्यांना मोबाईल पासून दूर करून मैदानावर खेळविण्यासाठी बळीराजा परिवाराचा प्रयत्न स्तुत्य आहे. कार्यक्रमाचे प्रारंभी बालाजी विद्यालय इसाद यांनी पथसंचलन करून मानवंदना दिली. यावेळी पाहुण्यांसमोर पारंपरिक खेळाचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांनी दाखविले.

हा महोत्सव दिनांक ०५ जानेवारी पर्यंत चालणार आहे. यामध्ये लुप्त होणाऱ्या खेळांचे प्रदर्शन आयोजित केले जाते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक दिगांबर दुधाटे यांनी तर सूत्रसंचालन रंगनाथ सुपेकर, गोपाळ गुरमे यांनी तर आभार प्रदर्शन नारायण चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बळीराजा शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी गिरीश सोळंखे, प्राचार्य डॉ. आत्माराम आरसुळे, माजी प्राचार्य डॉ. एच.टी. सातपुते यांच्यासह स्थानिक संचालक मंडळ, बळीराजा परिवारातील सर्व मुख्याध्यपक, क्रीडाशिक्षक यांनी परिश्रम घेतले.

# मंद्रुपच्या माहीरा अबॅकस सेंटरचा राज्यात डंका

## अबॅकस स्पर्धेत मंद्रुप, निंबर्गी चे घवघवीत यश

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.०२, सोलापूर :** सोलापूर तालुक्यातील मंद्रुप येथील माहीरा अबॅकस सेंटरने राज्यात नावलौकिक मिळवला आहे.

यामध्ये अबॅकस क्लास अंतर्गत मंद्रुपसह निंबर्गी, चे घवघवीत यश मि ळवले आहे. सोलापूर येथील हुतात्मा स्मृती मंदिर येथे आयोजित करण्यात आलेल्या नॅशनल अबॅकस स्पर्धे त माहिरा अबॅकसचे यश. ही स्पर्धा पुणे विभागअंतर्गत घेण्यात आलेल्या प्रोआक्टिव् अबॅकस नॅशनल स्पर्धे त माहिरा प्रोॲक्टिव अबॅकस क्लासचे घवघवीत यश मिळवले आहे.



सोलापूरसह लातूर, धाराशिव, पुणे, सातारा, सांगली जिल्ह्यातील इयत्ता एलकेजी ते आठवीपर्यंत चे १३५७४ विद्यार्थी सहभागी झाले होते.

यामधून यश व्हनमाने, आदित्य पोतदार, सार्थक म्हेत्रे, आदर्श साठे, इन्फ्रा शेख, दर्शन मरीआईवाले, अफराज मुल्ला, आर्श पटेल, महम्मद शेख , शाल्वी शाह, शिवराज साठे, रितेश मरीआईवले, असद शेख, ओमप्पा घाटे, सिद्धार्थ म्हेत्रे, अंजली म्हेत्रे, शुभम अडोळे, प्रांजल जाधव, आकाश जाधव, जय जाधव, तानाजी साठे, अरहान कोरके, वीर म्हेत्रे, समृद्धी मंद्रुपकर, सोमेश्वर अडोळे, तन्वी बनसोडे, दर्शन पाटील, प्रमोद शिवणगी, जय लाडे, वेदिका शेंडे, अनन्या माळगे, अल्ताफ शेतसंदी, प्रवीण कुंभार, वैष्णवी कुंभार, धर्मराज तुर्भे, श्री.नरोटे, वैदेही धारेराव, स्नेहल धारेराव यांनी घवघवीत यश मिळवले आले.

या सर्व विध्यार्थी साठी संचालक इमामबी मोमीन तसेच मैनोद्दीन मोमीन या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. माहिरा प्रोॲक्टिव अबॅकसचे संचालक सह सर्व विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

**अबॅकस का शिकावे, फायदे आणि वापर**

शालेय शिक्षणासोबत आपल्या मुलांना गणिताची आवड निर्माण करून गणिताची भीती नाहीसे करण्यासाठी, स्पर्धात्मक अभ्यासक्रम, विविध प्रकारच्या स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त असा हा ब्रेन डेव्हलपमेंट करणारा कोर्स आहे.

**- मैनोद्दीन मोमीन (संचालक माहीरा अबॅकस, मंद्रुप)**

# मोरोशी आश्रम शाळेतील अल्पवयीन विद्यार्थिनी आत्महत्येप्रकरणी महिला आयोगाची स्वाधिकारे दखल

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०३, मुरबाड (ठाणे) :** मुरबाड तालुक्यातील मोरोशी येथील शासकीय आश्रम शाळेत अल्पवयीन विद्यार्थिनीने आत्महत्या केल्याच्या दुर्दैवी घटनेची म हाराष्ट्र राज्य महिला आयोगाने स्वाधिकारे दखल घेतली आहे. या अनुषंगाने आज महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी संबंधित आश्रमशाळेस प्रत्यक्ष भेट देत प्रशासन व पोलिसांकडून घटनेच्या चौकशीबाबत सविस्तर आढावा घेतला.या प्रकरणी टोकावडे पोलीस ठाण्यात पॉक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस तपास सुरू आहे. सदर प्रकरणातील अल्पवयीन आरोपीस बालसुधारगृहात ठेवण्यात आले असून फॉरेन्सिक अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील तपास करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.या प्रकरणातील संशयितांची सखोल चौकशी करण्यासाठी अप्पर आयुक्त, आदिवासी विकास यांना शिफारस करण्यात आली आहे. मोरोशी येथील घटनेच्या अनुषंगाने विद्यार्थिनींबाबत अधिक्षिकेने सादर केलेल्या गोपनीय अहवालाच्या बाबतीत एकात्मिक




आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी यांनी दिरंगाई केली असल्यास, त्याचीही चौकशी करण्यात यावी, असे आदेश आदिवासी विकास आयुक्तांना देण्यात आले आहेत.

दरम्यान, या घटनेमुळे आश्रमशाळेत दाखल असलेल्या विद्यार्थिनींमध्ये मानसिक तणाव निर्माण झाला असण्याची शक्यता लक्षात घेऊन सर्व विद्यार्थिनींचे सम ुपदेशन करण्यात यावे, अशा सूचना रुपाली चाकणकर यांनी यावेळी प्रशासनाला दिल्या आहेत. तसेच आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना घरी नेण्यासाठी व परत सोडण्यासाठी येणाऱ्या नातेवाईकांसाठी स्वतंत्र नियम ावली तयार करावी, सर्व आश्रमशाळांचे रेकॉर्ड अचानक तपासणीद्वारे पडताळून पाहावी आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यासाठी समुपदेशकांची संख्या वाढवावी, अशा सूचनाही त्यांनी यावेळी आदिवासी विकास विभागाच्या सचिवांना दिल्या. चाकणकर यांनी मयत विद्यार्थिनीच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल आणि कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी आयोग त्यांच्या सोबत असल्याचे आश्वासन यावेळी त्यांनी दिले. या भेटीच्या वेळी आदिवासी विकास प्रकल्प उप आयुक्त अविनाश चव्हाण, प्रकल्प अधिकारी पेण तेजस्विनी गलांडे, शहापूर आदिवासी प्रकल्प अधिकारी दिवाकर काळपांडे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, नमिता शिंदे, बाल संरक्षण अधिकारी पल्लवी जाधव, केंद्र प्रशासक तेजस्विनी पाटील, तसेच पोलीस उपअधीक्षक व तपास अधिकारी उपस्थित होते.

# थोडक्यात

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी

**अक्षराज : शिवाजी औसेकर**



**दि.०३, केज (बीड) :** श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था आडस संचलित, माऊली विद्यालय जवळबन येथे भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका, मुख्याध्यापिका आणि थोर समाजसुधारक क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवून समाजातील अज्ञान दूर करणाऱ्या सावित्रीबाईंच्या कार्याला याप्रसंगी अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सावित्रीबाई फुले यांनी शिक्षण क्षेत्रात आणि महिलांच्या उत्थानासाठी जो संघर्ष केला, त्याचे महत्त्व विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. सावित्रीबाई नसत्या तर आज स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली झाली नसती, अशा भावना विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणांतून मांडल्या. अनेक विद्यार्थ्यांनी सावित्रीबाईंच्या जीवनप्रवासावर प्रकाश टाकून त्यांच्या त्यागाचा गौरव केला.या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने हजारे शिवाजी (अप्पा)भिवाजी, सोळंके एस.डी, देशमुख आर.आर, निकम ए.एम,पवार एल.एफ यांच्यासह इतर सर्व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या नियोजनात सहभाग घेतला. अत्यंत प्रेरणादायी वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये नवा उत्साह निर्माण केला.

## जि.प.हायस्कुल येथे सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त महिला पालक मेळावा संपन्न

**अक्षराज : अशोक लोणीकर**



**दि.०३, मुखेड (नांदेड) :** म ुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील जि.प.शाळेत शनिवार, दिनांक ०३ जानेवारी २०२६ रोजी सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अशोक लोणीकर हे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून पालक जितेंद्र कांबळे, किशन वाघमारे, मु.अ.शंतणू गाडे, सहशिक्षक शरद पाटील, कुलकर्णी जि.के., शेळके टी.बी., धनराज चव्हाण, महिला शिक्षिका पाटील पि.ए.उपस्थित होते. यावेळी सावित्रीबाई फुले यांच्याप्रतिमेला पुष्पहार घालुन व श्रीफळ फोडून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. शाळेतेली चिमुकल्यांनी साविञीबाई व पहिली मुस्लीम शिक्षिका फातीमा शेख यांच्या जिवन चरिञावर आपले मनोगत व्यक्त केले. यानिमित्ताने माता पालक मेळाव्याचे सुद्धा आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रम ाला माता पालक म्हणून सलीमा पठाण, सलीमा सय्यद, अस्मिता वाघमारे, वर्षा बोयवार, धुरपतबाई बोयवार, नागेश्वरी मुरारखारे, तब्बु शेख, महानंदा कांबळे, संगिता भंडारे, वनिता सुर्यवंशी आदी उपस्थित होत्या.

## कानगाव जिल्हा परिषद शाळेत सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**अक्षराज : प्रतिनिधी**




**दि.०३, दौड (पुणे) :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती अर्थात बालिका दिन जि.प.प्राथ शाळा कानगाव तालुका दौंड येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी केलेल्या वेशभूषा सर्वांचे आकर्षण ठरल्या. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किरण कोऱ्हाळे व शाळेचे मुख्याध्यापक संजय गवळी यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी सावित्रीबाईंच्या कार्याला उजाळा दिला. संध्या कुंभार यांनी प्रस्तावित केले. श्याम ठाणेदार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम ाचे सूत्रसंचालन उपशिक्षक राजेंद्र जगताप यांनी केले, तर श्री.हराळ यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे नियोजन प्रकाश लकडे, सखाराम खोमणे यांनी केले. यावेळी पालक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सावित्रीबाई फुले जयंतीदिनानिमित्त नमुंमपा मुख्यालयात प्रतिमापुजनाद्वारे अभिवादन

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०३, नवी मुंबई :** भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका, पहिल्या मुख्याध्यापिका व स्त्रियांच्या विकासाचा पाया रचणाऱ्या थोर समाजसुधारक क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनानिमित्त नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात ॲम्फिथिएटर येथे प्रशासन विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे यांच्या शुभ हस्ते प्रतिमापूजन संपन्न झाले. याप्रसंगी कार्यकारी अभियंता प्रविण गाडे आणि इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# के.रामलू शाळा ही IIT/ NEET क्षेत्रात लातूर पॅटर्न अवलंबत आहे - सपोनि शिंदे

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०३, नांदेड :** कुंडलवाडी येथील के.रामलू पब्लिक स्कूल येथे फाऊंडेशन संचलित स्पर्धा परीक्षा बक्षीस वितरण सोहळा शाळेत मोठ्या उत्साहात पार पडला. या परीक्षेत शाळेतून तब्बल ९० विद्यार्थी बक्षिसाचे मानकरी ठरले. गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गोल्ड मेडल रोख रक्कम ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी कुंडलवाडी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून मुकेश नल्लीगोंडा विद्या आराधना अकॅडमी नांदेड, डॉ.लखमपुरे,



प्रा.आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी सारिका अनमूलवाड बाल रोग तज्ज्ञ डॉ. संतोष पाटील, नवाब अहेमद पंजाबी, शंकरराव मिरदोडे, गंगाधर भिंगे व या शाळेचे संस्थापक अध्यक्ष साईरेड्डी ठक्कुरवार संचालिका रमा ठक्कुरवार, प्रिंसिपल एस जाधव व्हाय प्रिंसिपल एम सपना यांच्या शुभ हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले.

के.रामलू पब्लिक स्कूल फाऊंडेशन अंतर्गत चालणाऱ्या या बाबतीत बोलताना या संस्थेचे अध्यक्ष साईरेड्डी ठक्कुरवार यांनी प्रास्ताविकात आजच्या माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात स्पर्धा परीक्षा हाच आपले ज्ञान अद्ययावत ठेवण्याचा मार्ग आहे. IIT/ NEET फॉऊंडेशन च्या सन २०२४-२५मध्ये वर्षभरात घेण्यात आलेल्या परीक्षेत विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रमाने व जिद्दीने दैदीप्यमान यश संपादन केले आहे. त्याचं सोबत NSSE, SHREYA व इंटरनॅशनल मॅथेमॅटिक ओलंपियाड या स्पर्धेत देखील विशेष प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचे त्यांनी अभिनंदन करून कौतुक केले व ग्रामीण भागातील गरीब पालकांच्या मुलांना शहरातील IIT/NEET शैक्षणिक दर्जा इथेच कमी दरात देण्यात यावा. हा उद्देश त्यांनी यावेळी बोलताना सांगितले आहे. कारण ही मुलं पुढे स्पर्धेच्या युगात टिकतील असं त्यांनी मत व्यक्त केले आहे. फाऊंडेशन संचलित स्पर्धा परीक्षेच्या बक्षिस वितरणाच्या कार्यक्रम ाचा प्रारंभ क्रांतीज्योती सावित्रीबाई फ ुले यांच्या जयंती निमित्त प्रतिमेचे पूजन दीपप्रज्वलनाने करताना सर्व उपस्थित मान्यवर होते.

या कार्यक्रम प्रसंगी या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मुकेश नल्लीगोंडा यांनी फाउंडेशन बद्दल सर्व विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले. या कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी कुंडलवाडी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांनी के.रामलू पब्लिक स्कूल ही शाळा IIT/NEET क्षेत्रात लातूर पॅटर्न अवलंबत आहे. असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले आहे. यावेळी स्पर्धात्मक युगामध्ये ज्ञानाची अचूक पातळी कशी गाठावी व तणाव विरहित ज्ञान कसे संपादित करावे, यावरही यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी क्रांतीज्योती सावित्रीबाई फ ुले यांच्या जयंतीनिमित्त पूजा ठोमसे, श्रावणी शिंदे या विद्यार्थी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर भाषण केले. सर्व विद्यार्थ्यांना ट्रॉफी देण्याचे अचूक नियोजन शिक्षिका संध्या पाठक, श्यामला किणीकर यांनी केले तर सर्व यशस्वी विद्यार्थ्यांनी ट्रॉफी घेतल्यानंतर आपल्या मित्रांसोबत, मार्गदर्शक शिक्षक तसेच परिवारासह सेल्फी पॉईंटचा आनंद घेतला.